पुणे महानगरपालिका
स्थायी समिती
कार्यपत्रिका क्र. ०७
सभा क्र.१४, दिनांक १९/०५/२०२३ चा वृत्तांत

पुणे महानगरपालिका स्थायी समितीची साप्ताहिक सभा शुक्रवार, दि. १९/०५/२०२३ दुपारी ३.३० (तीन वाजून तीस मिनिटे) वाजता मा.महापालिका आयुक्त कार्यालय,पुणे महानगरपालिका भवन, पुणे येथे संपन्न झाली.

सदर सभेस मा.प्रशासक तथा आयुक्त, पुणे महानगरपालिका व नगरसचिव हे उपस्थित होते. तसेच संबंधीत विषयांचे काही खाते प्रमुख उपस्थित होते.

मा. प्रशासक तथा आयुक्त, पुणे महानगरपालिका यांचेकडे स्थायी समितीचे विषय सादर करण्यात आले, त्यावर मा.प्रशासक तथा आयुक्त, पुणे महानगरपालिका यांनी खालीलप्रमाणे निर्णय दिले आहेत.

दाखल विषय

विषय क्र. १७९त्वर्य

पुणे महानगरपालिकेकडील नजीकच्या जमाखर्चाचा विचार करता रक्कम रू. ४९० कोटी १२ महिने ३६५/३६६ दिवस, ६ महिने/१८१ दिवस किंवा त्यापेक्षा कमी / जास्त कालावधीसाठी गुंतवणूक करणेस उपलब्ध होत असल्याने रक्कम रू. ४९० कोटी ७० % प्रमाणे, मे. महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र. संकीर्ण–२०२०/प्र.क्र.५१/२०/कोषा प्रशा –५ , दि. १३ मार्च २०२० नुसार राष्ट्रीयकृत बँकेतच ठेवणेबाबत किंवा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९२ नुसार सार्वजनिक कर्जरोख्यात किंवा केंद्र सरकार, राज्य शासन, शासनाचे उपक्रम, शासनाच्या वित्तीय संस्था किंवा युनिट ट्रस्ट ऑफ इंडिया यांच्या कर्जरोख्यांमध्ये किंवा ऋणपत्रांमध्ये गुतवणूक करणेस, गुंतवणूकीचे सर्व अधिकार मा. महापालिका आयुक्त यांनादेणेस व आवश्यकता भासलेस सदरची गुंतवणूक मुदतपूर्व मोकळी करण्यास मान्यता मिळणेबाबत मा. अति.महा.आयुक्त (ज)यांचे जा.क्र. मआ/मुले/१४०, दि. १८/५/२०२३ चे पत्र.

निर्णय– सदरचा विषय दाखल करून मान्य करण्यात येत आहे.

विषय क्र. १८०त्वर्य

पुणे महानगरपालिकेकडील नजीकच्या जमाखर्चाचा विचार करता रक्कम रू. २१० कोटी १२ महिने ३६५/३६६ दिवस, ६ महिने/१८१ दिवस किंवा त्यापेक्षा कमी / जास्त कालावधीसाठी गुंतवणूक करणेस उपलब्ध होत असल्याने रक्कम रू. २१० कोटी ३० % प्रमाणे, मे. महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र. संकीर्ण–२०२०/प्र.क्र.५१/२०/कोषा प्रशा –५ , दि. १३ मार्च २०२० नुसार राष्ट्रीयकृत बँकेतच ठेवणेबाबत किंवा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९२ नुसार सार्वजनिक कर्जरोख्यात किंवा केंद्र सरकार, राज्य शासन, शासनाचे उपक्रम, शासनाच्या वित्तीय संस्था किंवा युनिट ट्रस्ट ऑफ इंडिया यांच्या कर्जरोख्यांमध्ये किंवा ऋणपत्रांमध्ये गुतवणूक करणेस, गुंतवणूकीचे सर्व अधिकार मा. महापालिका आयुक्त यांना देणेस व आवश्यकता भासलेस सदरची गुंतवणूक मुदतपूर्व मोकळी करण्यास मान्यता मिळणेबाबत मा. अति.महा.आयुक्त (ज)यांचे जा.क्र. मआ/मुले/१४१, दि. १८/५/२०२३ चे पत्र.

निर्णय– सदरचा विषय दाखल करून मान्य करण्यात येत आहे.

विषय क्र. १८१त्वर्य

सन २०२२–२३ मधील दुसरी सहामाही दि.०१/१०/२०२२ ते ३१/०३/२०२३ साठीचे अर्धवार्षिक आर्थिक पत्रक अवलोकनार्थ सादर करणेबाबत मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मुले/१४२, दि. १९/५/२०२३ चे पत्र.

निर्णय– सदर विषयाची नोंद घेण्यात आली.

कार्यपत्रिकेवरील विषय

उपआयुक्त विभागीय कार्यालय यांचे कामकाजाचा आढावा

विषय क्र.१४४

उप आयुक्त, परिमंडळ विभागक्र. १ चे अखत्यारीत येणाऱ्या ढोलेपाटील रोड/येरवडा–कळस/ नगररोड (वडगांवशेरी) क्षेत्रिय कार्यालयांकडील माहे एप्रिल २०२३ चा अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.उपआयुक्त, परिमंडळ विभाग क्र.१ यांचे जा.क्र. उप–१/११९०, दि. ९/५/२०२३चे पत्र.

निर्णय – सदर विषयाची नोंद घेण्यात आली.

विषय क्र.१४५

उप आयुक्त, परिमंडळ क्र. ४ कार्यालयाचे नियंत्रणाखालील हडपसर–मुंढवा, वानवडी–रामटेकडी व कोंढवा–येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालयांकडील दि. १/३/२०२३ ते दि. ३१/३/२०२३ चा अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा. उपआयुक्त परिमंडळ क्र.४, यांचे जा.क्र. उआप/४/६१६, दि. ११/५/२०२३चे पत्र.

निर्णय – सदर विषयाची नोंद घेण्यात आली.

विषय क्र.१४६

उप आयुक्त, परिमंडळ क्र. ५ कार्यालयाचे नियंत्रणाखाली महापालिका सहाय्यक आयुक्त बिबवेवाडी, भवानी पेठ, कसबा विश्रामबागवाडा कार्यालयांकडील माहे मार्च २०२३ चा अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.उपआयुक्त, परिमंडळ क्र.५ यांचेजा.क्र. उआ–५/६३३ दि. १५/५/२०२३चे पत्र.

निर्णय – सदर विषयाची नोंद घेण्यात आली.

माहितीसाठी आलेले विषय

विषय क्र.१४७

उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. ४ यांच्या अखत्यारीतील कामांच्या दि. १/०३/२०२३ ते दि. १५/०३/२०२३ ची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त (ई)यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तदनुषंगिक माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (ई) यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.४/११५, दि. १०/५/२०२३चे पत्र.

निर्णय – सदर विषयाची नोंद घेण्यात आली.

विषय क्र.१४८

उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. ४ यांच्या अखत्यारीतील कामांच्या दि. १/०४/२०२३ ते दि. १५/०४/२०२३ ची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त (ई)यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तदनुषंगिक माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (ई) यांचे जा.क्र. मआ/परि.४/११६, दि. १०/५/२०२३चे पत्र.

निर्णय – सदर विषयाची नोंद घेण्यात आली.

विषय क्र.१४९

उप आयुक्त, परिमंडळ विभागक्र. ४ यांच्या अखत्यारीतील कामांच्या दि. १६/०३/२०२३ ते दि. ३१/०३/२०२३ ची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त (ई)यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तदनुषंगिक माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (ई)यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.४/११८, दि. १०/५/२०२३ चे पत्र.

निर्णय – सदर विषयाची नोंद घेण्यात आली.

सर्वात कमी रक्कमेचे टेंडर्स

विषय क्र. १५०

पुणे शहरात विविध ठिकाणी पुनःडांबरीकरण व तदनुषंगिक कामे करणे (पॅकेज ४) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. डी.जी. बेल्हेकर अॅण्ड कंपनी यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे(टेंडर र.रू. ५६,५७,४६,०५३/– पेक्षा१८.३० % कमी) असल्याने त्यांचेकडून र.रू. ४६,२२,१४,५२५=३० पर्यंत काम करून घेणेस, अधिक जी.एस.टी.र.रू. १०,१८,३४,२८९=५० पर्यंत अधिक रॉयल्टी र.रू. १४,०९,७०९=७८ पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रू. १३,१७,९०५/– (असे एकूण र.रू. ५६,६७,७६,४२९=६०)पर्यंत अधिक टेंडर अटी शर्तीनुसार विशेष भाववाढ व सर्वसाधारण भाववाढ सुत्रानुसार फरक अदा/कपात करणेस व त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/पथ/१२०,दि. ११/५/२०२३ चे पत्र.

निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.

विषय क्र. १५१

पुणे शहरात विविध ठिकाणी पुर्नडांबरीकरण करणे व तदनुषंगिक कामे करणे (पॅकेज ५) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.श्री. असोसिएटस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे(टेंडर र.रू. ५१,७७,६२,०९६=३०पेक्षा१३.८० % कमी) असल्याने त्यांचेकडून र.रू. ४४,६३,१०,९२७=०१ अधिक जी.एस.टी.र.रू. ९,३१,९७,१७७=३४ पर्यंतअधिक रॉयल्टी चार्जेस र.रू. ४४,२५,३१८=९० पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग र.रू. १०,४४,२८०/– अशी एकूण र.रू. ५४,४९,७७,७०३=२५ पर्यंत अधिक टेंडर अटी शर्तीनुसार विशेष भाववाढ व सर्वसाधारण भाववाढ सुत्रानुसार फरक अदा/कपात करणेस व त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/पथ/१२१,दि. ११/५/२०२३ चे पत्र.

निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.

विषय क्र. १५२

घनकचरा वाहतुकीची वाहने व बकेट दुरूस्तीसाठी ठेका पद्धतीने वेल्डर, फिटर, अॅटो इलेक्ट्रिशियन, स्प्रेपेंटर, सुतार व हेल्पर सेवक घेणेसाठी टेंडर मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. दिशा एजन्सी यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (पुगप र.रू. ४,५९,९४,५९९/– पेक्षा ३.६० %जादा)असल्याने त्यांचेकडून त्यांचे टेंडर दराने याप्रमाणे शासनाने वेळोवेळी निश्चित केलेल्या नविन वाढीव डीए (महागाई भत्या) आदा करून रक्कम रू. ४,७६,५०,४०४=५६ पर्यंत आवश्यकतेनुसार घेणेस व त्यापोटी त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा. अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/मोवावि/१२२,दि. ११/५/२०२३ चे पत्र.

निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.

विषय क्र. १५३

जिल्हा वार्षिक योजनासन २०२२–२३ नाविन्यपूर्ण योजनेंतर्गत पुणे महानगरपालिकेच्या शाळांमध्ये अॅस्ट्रॉनॉमि लॅब व सायन्स लॅबकरिता आवश्यक साहित्य खरेदी करणे(D.P.D.C) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.त्रिमूर्ती इंजिनियरिंग व मे. एज्युनीड्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचेठेकेदारमे.त्रिमूर्ती इंजिनियरिंग यांचेकडून (पुगप र.रू. २,४९,७७,०००/–पेक्षा०.०७६०७%

कमी) असल्याने त्यांचेकडून र.रू. २,४९,५८,०००/– (सर्व करांसह) तसेच सायन्स लॅब मे. एज्युनीड्स यांचेकडून(पुगप र.रू. १,९९,९५,०५०/–पेक्षा०.११५२७९ % कमी) असल्याने त्यांचेकडून र.रू. १,९९,७२,०००/– (सर्व करांसह) पर्यंत असे एकूण रक्कम रूपये ४,४९,५३,०५०/– पर्यंत आवश्यक साहित्य खरेदी करणेस व त्याप्रमाणे त्यांचेशी करारनामा, तसेच त्यापोटी होणारे बिल त्यांना अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा. अति.महा.आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/भांडार/१२३,दि. ११/५/२०२३ चे पत्र.

निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.

विषय क्र. १५४

पुणे महानगरपालिकेमध्ये नव्याने समाविष्ट झालेल्या सुस व म्हाळुंगे या गावांमध्ये समान पाणीपुरवठा योजनेअंतर्गत विविध क्षमतेचे आर.सी.सी. (ESR आणि GSR) टाक्यांचे बांधकाम करणे (नकाशे व आर.सी.सी. डिझाईनसह) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदारमे.एस.बी.खकाळ यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे(टेंडर र.रू. २०,६५,४९,२७३/–पेक्षा ९.९०० % जास्त)असल्याने त्यांचेकडून र.रू. २२,६९,९७,६५१=०२७ अधिक १८ %वस्तू व सेवाकर र.रू. ४,०८,५९,५७७=१८ असे एकूण र.रू. २६,७८,५७,२२८=२१अधिक विशेष भाववाढ सूत्र व सर्वसाधारण भाववाढ सुत्रानुसार येणाऱ्या कमी/अधिक रकमेपर्यंत उपलब्ध रक्कमेच्या मर्यादित काम करून घेणेस व त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/पापु/१२६,दि. ११/५/२०२३ चे पत्र.

निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.

विषय क्र. १५५

पुणे शहरात होणाऱ्या जी–२० या आंतरराष्ट्रीय परिषदेच्या अनुषंगाने पुणे मुंबई रस्त्यावरील शासकीय अभियांत्रिकी कॉलेज (COEP)उड्डाणपुलाला आकर्षक प्रकाशव्यवस्था करणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.पवन क्विक सर्व्हिसयांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (पुर्वगणनपत्रक र.रू. ४९,९९,८४९/– मधील निविदा र.रू. ४२,३७,१६०/– (अधिक १८%जीएसटी) च्या०.९०% कमीदराने) असल्यानेत्यांचेकडून र.रू. ४१,९९,०२५=५६ अधिक १८% जीएसटी र.रू. ७,५५,८२४=६० असे एकूण र.रू. ४९,५४,८५०=१६ पर्यंत काम करून घेणेस, त्याप्रमाणे त्यांचेशी करारनामा करणेस व त्यानुसार केलेल्या कामाचे बिल अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा. अति.महा.आयुक्त (ई) यांचे जा.क्र.मआ/विद्युत/१२७,दि. १२/५/२०२३ चे पत्र.

निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.

विषय क्र. १५६

पुणे शहरात होणाऱ्या जी–२० या आंतरराष्ट्रीय परिषदेच्या अनुषंगाने शहर सौंदर्याकारणासाठी पुणे शहरातील गोल्फ कोर्स या चौकातील पुलावर आकर्षक प्रकाश व्यवस्था करणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्य ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.मोरेश्वर इलेक्ट्रिकल कॉर्पोरेशन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (पुर्वगणनपत्रक र.रू. ४०,१०,७६५/– चे पूर्वगणनपत्रक मधील निविदा र.रू. ३३,९८,९५३/– (अधिक १८%जीएसटी) च्या ०४.५१% कमी दराने) असल्याने त्यांचेकडून र.रू. ३२,४५,६६०=२२ अधिक १८% जीएसटी र.रू. ५,८४,२१८=८४ असे एकूण र.रू. ३८,२९,८७९=०६ पर्यंत काम करून घेणेस, सदरचे काम ब पाकीट उघडलेचे दिनांक (०९/०२/२०२३) पासून सुरू करणेस व त्याप्रमाणे त्यांचेशी करारनामा करणेस व त्यानुसार केलेल्या कामाचे बिल अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा. अति.महा.आयुक्त (ई) यांचे जा.क्र.मआ/विद्युत/१२८,दि. १२/५/२०२३ चे पत्र.

निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.

विषय क्र. १५७

कसबा विश्रामबागवाडा क्षेत्रिय कार्यालयाच्या अखत्यारीतील अस्तित्वातील नाल्यातील मलवाहिन्या व चेंबर्स देखभाल व दुरूस्ती करणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्या५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.अमोल एन्टरप्रायजेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रू. ८९,४२,२६२/–पेक्षा५.३३% कमी दराने)असल्याने त्यांचेकडून र.रू. ८४,६५,६३९=४४ व अधिक रॉयल्टी चार्जेस र.रू. ५७,७३१/– असे एकूण र.रू. ८५,२३,३७०=४४ अधिक सर्वसाधारण भाववाढ सुत्रानुसार येणारी फरकाची रक्कम देणेस अथवा कपात होणाऱ्या रक्कमेनुसार व उपलब्ध असलेल्या तरतूदपर्यंत काम करून घेण्यासाठी व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा. अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/मलनिःस्सारण/१२९, दि. १२/५/२०२३ चे पत्र.

निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.

विषय क्र. १५८

औंध–बाणेर क्षेत्रिय कार्यालयाच्या अंतर्गत बाणेरएस.टी.पी कडे येणाऱ्या मुख्य मलवाहिन्यांची देखभाल दुरूस्ती करणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.देवकर अँन्ड सन्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रू. ८३,२८,३०४/– पेक्षा४३.४६% कमी)असल्याने त्यांचेकडून र.रू. ४७,०८,८२३=०८ अधिक जीएसटी र.रू. ८,४७,५८८=१५ अधिक रॉयल्टी चार्जेस र.रू. १,७२,५७५=६३ असे एकूणर.रू. ५७,२८,९८६=८६ व विशेष भाववाढ सुत्रानुसार (स्टार रेट) येणारी फरकाची रक्कम देणेस अथवा कपात होणाऱ्या रक्कमेनुसार व उपलब्ध असलेल्या तरतूदीपर्यंत काम करून घेण्यासाठी व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा. अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/मलनिःस्सारण/१३०, दि. १२/५/२०२३ चे पत्र.

निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.

विषय क्र. १५९

बिबवेवाडी क्षेत्रिय कार्यालयाच्या अखत्यारीतील अस्तित्वातील मलवाहिन्या व चेंबर्सची दुरूस्ती करणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्या२ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. निर्मल मोतीलाल हरिहर यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रू. ८८,५५,५२४/-पेक्षा३५.००% कमी निविदादराने) असल्याने त्यांचेकडून र.रू. ५७,५६,०९०=६० अधिक रॉयल्टी चार्जेस र.रू. १,४४,३३३/- असे एकूणर.रू. ५९,००,४२३=६० सर्वसाधारण भाववाढ सुत्रानुसार येणारी फरकाची रक्कम देणेस अथवा कपात होणाऱ्या रक्कमेपर्यंत तसेच उपलब्ध तरतूदीपर्यंत काम करून घेण्यासाठी व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा. अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/मलनिःस्सारण/१३१, दि. १२/५/२०२३ चे पत्र.

निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.

विषय क्र. १६०

वानवडी रामटेकडी क्षेत्रिय कार्यालयाअंतर्गत येणाऱ्या मुख्य मलवाहिन्यांची देखभाल व दुरूस्तीची कामे करणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.अमित कचरू कोंडे यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे(टेंडर र.रू. ८९,२९,७५८/-पेक्षा३७.८० % कमी निविदादराने) असल्याने त्यांचेकडून र.रू. ५५,५४,३०९=४८ व अधिक रॉयल्टी चार्जेस र.रू. ७०,०३८/- असे एकूण र.रू. ५६,२४,३४७=४८अधिक सर्वसाधारण भाववाढ सुत्रानुसार येणारी फरकाची रक्कम देणेस अथवा कपात होणाऱ्या रक्कमेनुसार व उपलब्ध असलेल्या तरतूदपर्यंत काम करून घेण्यासाठी व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा. अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/मलनिःस्सारण/१३२, दि. १२/५/२०२३ चे पत्र.

निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.

विषय क्र. १६१

कसबा पंपिंगकडे येणाऱ्या क्षेत्रिय कार्यालयाच्या अखत्यारीतील मलवाहिनींची देखभाल व दुरूस्ती करणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.अमोल एन्टरप्रायजेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रू. ८९,४२,२६२/-पेक्षा५.३३% कमी निविदादराने) असल्याने त्यांचेकडून र.रू. ८४,६५,६३९=४४ व अधिक रॉयल्टी चार्जेस र.रू. ५७,७३१/- असे एकूण र.रू. ८५,२३,३७०=४४अधिक सर्वसाधारण भाववाढ सुत्रानुसार येणारी फरकाची रक्कम देणेस अथवा कपात होणाऱ्या रक्कमेनुसार व उपलब्ध असलेल्या तरतूदपर्यंत काम करून घेण्यासाठी व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा. अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.मआ/मलनिःस्सारण/१३३, दि. १२/५/२०२३ चे पत्र.

निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.

विषय क्र. १६२

आरोग्य खाते किटक प्रतीबंधक विभागासाठी पायरीप्रॉक्सीफेन 0.5 GR (ग्रॅन्युअल)औषधाची खरेदी करणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. प्रोटेक्ट, मुंबई यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे असल्याने त्यांचेकडून पायरीप्रॉक्सीफेन 0.5 GR(ग्रॅन्युअल) १३२० किलोसाठी र.रू. ९९,६३३०९=१८ सर्व करांसह असा लघुत्तम दरदेणारे ठेकेदार मे. प्रोटेक्ट, मुंबई यांचेकडून एकूण १३२० किलोऔषधाची रक्कम रू. ९९,६३,३०९=१८ सर्व करांसहपर्यंतखरेदीकरणेत्यासाठी त्यांचेशीकरारनामाकरणेसत्यापोटी होणारे बिल सन २०२३-२४RE17F133C या अर्थशिर्षकावर खर्ची टाकणेस मान्यता मिळणेबाबत मा. अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/आरोग्य/१३४, दि. १५/५/२०२३ चे पत्र.

निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.

विषय क्र. १६३

कार्यकारी अभियंता क्र.२ यांचे कार्यक्षेत्रात जी-२० परिषदेच्या अनुषंगाने मुख्य रस्ते पुनःडांबरीकरण करणे व तदनुषंगिक कामे करणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ७ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.देवकर अर्थमुव्हर्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रू. ८४,५०,९७५/-पेक्षा१९.५८% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रू. ६७,९६,२७४=१० पर्यंत काम करून घेणेस , अधिकजीएसटी र.रू. १५,२१,१७५=५पर्यंतअधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रू. २४,५३०/- (असे एकूणर.रू. ८३,४१,९७९=६०)पर्यंतअधिक टेंडर अटीशर्तीतील विशेष भाववाढ व सर्वसाधारण भाववाढ सुत्रानुसार फरक अदा / कपातकरणेस व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा. अति.महा.आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/पथ/१३५ , दि. १६/५/२०२३ चे पत्र.

निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.

विषय क्र. १६४

पुणे पेठ कोथरूड स.नं. ६९, ७० या ठिकाणी एक्झिबिशन सेंटरचे उर्वरित कामे करणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.नोबेल कन्स्ट्रक्शन कं. यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे(टेंडर र.रू. ८,०१,३९,९७७/- पेक्षा ॲटपार दराने)असल्याने त्यांचेकडून र.रू. ८,०१,३९,९७७/-अधिक जीएसटी र.रू. १,४४,२५,१९६/- अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रू. १,८१,८६५/- अधिक रॉयल्टी चार्जेस र.रू. ११,०२,५१८/- पर्यंत टेंडर अटी शर्तीनुसार सिमेंट, स्टील यांना विशेष भाववाढ (स्टार रेट) सुत्राप्रमाणे व लेबर, मटेरिअल, पेट्रोल/डिझेलसाठी भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यापोटी त्यांचेशी करारनामा करून काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा. अति.महा.आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/भवन/१३६,दि. १७/५/२०२३ चे पत्र.

निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.

विषय क्र. १६५

स्व. पु.ल. देशपांडे उद्यान येथे कलाग्राम विकसित करणे कामाअंतर्गत ॲम्पि थिएटरचे काम करणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ९ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. मदन एंटरप्रायजेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रू. ७६,७९,९५९/- पेक्षा२९.६२ %कमी तडजोडीने)असल्याने त्यांचेकडून र.रू. ५४,०५,१५५=१४, अधिक जीएसटी र.रू.९,७२,९२८/- अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रू. ३८,६९५/- अधिक रॉयल्टी चार्जेस र.रू. ८,९७,५७९=३६ पर्यंत टेंडर अटी शर्तीनुसार सिमेंट, स्टील यांना विशेष भाववाढ (स्टार रेट) सुत्राप्रमाणे व लेबर, मटेरिअल, पेट्रोल/डिझेलसाठी भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यापोटी त्यांचेशी करारनामा करून काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा. अति. महा.आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/भवन/१३७,दि. १७/५/२०२३ चे पत्र.

निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.

विषय क्र. १६६

प्रभाग क्र. ४१ मधील टिळेकरनगर येवलेवाडी येथील २४ मी. डी.पी. रस्ता विकसित करणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ९ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.साईप्रभा कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडरर.रू. १८,२९,२०,८१५/-पेक्षा१६.१६% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रू. १५,३३,६०,८११=३० अधिक जीएसटी र.रू. २,७६,०४,९४६/-पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रू. २३,१९,३४८/- पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग र.रू. १३,०८,५४०/- अशी एकूण र.रू. १८,४५,९३,६४५=३० पर्यंत अधिक टेंडर अटीशर्तीनुसार विशेष भाववाढ व सर्वसाधारण भाववाढ सुत्रानुसार फरक अदा / कपात करणेस व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा. अति.महा.आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/पथ/१३९ , दि. १८/५/२०२३ चे पत्र.

निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.

<u>मागीलसभेचे विषय</u>

विषय क्र.१६७

पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप धर्तीवर डेव्हलपमेंट क्रेडिटनोट या मोबदल्याच्या स्वरूपात शहरातील डी.पी. रस्ते व पुल विकसित करणे या प्रकल्पाअंतर्गत डेव्हलपमेंट क्रेडिटनोट निर्माण करणे या करिता सॉफ्टवेअर बनविणे व डेव्हलपमेंट क्रेडिटनोटची छपाई तसेच अनुषंगिक प्रिंटर खरेदी करणे (बी-२ पद्धतीची) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. न्याती टेक्नोलॉजीस प्रा.लि. यांचे टेंडर दोघात कमी रकमेचे असल्याने त्यांचेकडून र.रु. ८२,८४,७५४/- अधिक जी.एस.टी. पर्यंत अदा करणेस / करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा. आयुक्त (इस्टेट) यांचे जा.क्र. मआ/पथ/६४३,दि. २३/९/२०२२ चे पत्र.

(टीप- सदर विषयाचा विचार १ महिन्यांनंतर करावा असे दि. १७/४/२०२३ च्या सभेत ठरले होते.)

निर्णय– सदर विषयाचा विचार १ महिन्यांनंतर करण्यात यावा.

विषय क्र. १६८

पुणे महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेवरील वाहनतळांचे बाबतीत कोविड-१९ या साथरोगाचे कालावधीतील वार्षिक मक्ता रकमेमध्ये काही प्रमाणात सवलत मान्य करणेबाबत मा.सौ.दिपाली धुमाळ, विरोधी पक्षनेता, मा.आबा बागुल व मा.सौ.नंदा लोणकर यांचे दि. १२/४/२०२१ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. १११ दि. १२/४/२०२१ ला अनुसरुन मा.महा.आयुक्तयांनी जा.क्र. मआ/प्रकल्प/८०७ दि.३/११/२०२१ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी

(टीप- सदर विषयाचा विचार १ महिन्यांनंतर करावा असे दि. १७/४/२०२३ च्या सभेत ठरले होते.)

निर्णय– सदर विषयाचा विचार १ महिन्यांनंतर करण्यात यावा.

विषय क्र. १६९

पुणे शहराच्या हद्दीमधील रस्त्यांवर विविध सेवा वाहिन्या टाकणेसाठी शासकीय संस्थांना देण्यात येणारी सवलत रद्द करणे याकरिता खालील बाबींस मा. स्थायी समिती मार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/पथ/७११ दि.११/१०/२०२१चेपत्र.

१. मा. मुख्य सभेने ठ.क्र. ७० दि. २२/६/२०१५अन्वये पारित केलेला ठराव निरस्त करणेस.

२. मे.एम.एन.जी.एल., महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळ व इतर सर्व शासकीय संस्थाना रस्ता पुर्नस्थापना दरामध्ये देण्यात येणारी सवलत रद्द करुन पुणे महानगरपालिकेमार्फत दरवर्षीच्या दरपत्रकानुसार वेळोवेळी निश्चित केलेल्या दराप्रमाणे दर आकारणेस.

(टीप- सदर विषयाचा विचार १ महिन्यांनंतर करावा असे दि. १७/४/२०२३ च्यासभेत ठरले होते.)

निर्णय– सदर विषयाचा विचार १ महिन्यांनंतर करण्यात यावा.

विषय क्र. १७०

अग्निशमन सेवापुरविणेच्या दरामध्ये मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रामध्ये नमुद केल्याप्रमाणे दरवाढ करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/अग्निशमन /७१ दि. २०/५/२०२० चे पत्र.

(टीप- सदर विषयाचा विचार १ महिन्यांनंतर करावा असे दि. १७/४/२०२३ च्या सभेत ठरले होते.)

निर्णय– सदर विषयाचा विचार १ महिन्यांनंतर करण्यात यावा.

विषय क्र. १७१

पुणे महानगरपालिकेच्या चाळ विभागाकडील मनपा वसाहतीमध्ये राहणाऱ्या (रस्ता रुंदीकरण, पुरग्रस्त, गवनि पुर्नवसन व प्रकल्पबाधित) बिगर मनपा सदनिकाधारकांचे निवासी घरभाडे/लायसेन्स फी मध्ये भाडेवाढ करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/सीएसओ/१३९३ दि.१८/२/२०१९ चे पत्र.

(टीप– सदर विषयाचा विचार १ महिन्यांनंतर करावा असे दि. १७/४/२०२३ च्या सभेत ठरले होते.)

निर्णय– सदर विषयाचा विचार १ महिन्यांनंतर करण्यात यावा.

विषय क्र.१७२

आरोग्य कार्यालयाकडील विविध विभागामार्फत सद्याच्या आकारण्यात येणारे प्रस्तावित मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रासोबत जोडलेल्या शुल्क दरातवाढ करून प्रस्तावित केलेल्या शुल्क दि.०१/०४/२०२१ पासून आकारणीस करण्यास मा. स्थायी समितीमार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबतमा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/१००७ दि.२२/३/२०२१ चे पत्र.

(टीप– सदर विषयाचा विचार १ महिन्यांनंतर करावा असे दि. १७/४/२०२३ च्यासभेत ठरले होते.)

निर्णय– सदर विषयाचा विचार १ महिन्यांनंतर करण्यात यावा.

विषय क्र. १७३

भूमीगत केबलसाठी आकारणी करावयाच्या मालमत्ता कराच्या धोरणाबाबत मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/टिजीओ/४२२ दि.१०/८/२०२१ चे पत्र.

(टीप– सदर विषयाचा विचार १ महिन्यांनंतर करावा असे दि. १७/४/२०२३ च्या सभेत ठरले होते.)

निर्णय– सदर विषयाचा विचार १ महिन्यांनंतर करण्यात यावा.

विषय क्र. १७४

पुणे महानगरपालिकेच्या उद्यानांचे प्रवेश शुल्कामध्ये मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रासोबतच्या परिशिष्ठ क्र. १ मधील अ.क्र. १ ते १३ उद्यानांचे सद्य:स्थितीत असलेले प्रचलित प्रवेशशुल्क वाढवून उद्यानांचे प्रवेशशुल्क प्रस्तावित दरांप्रमाणे प्रौढांसाठी र.रु.१०/– व लहान मुलांसाठी र.रु. ५/–, मासिक पास र.रु. २००/– व विदेशी नागरिक र.रु. १००/– दैनंदिन तिकीट या प्रमाणे आकारणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/उदयान/१४२ दि.२९/६/२०२० चे पत्र.

(टीप– सदर विषयाचा विचार १ महिन्यांनंतर करावा असे दि. १७/४/२०२३ च्या सभेत ठरले होते.)

निर्णय– सदर विषयाचा विचार १ महिन्यांनंतर करण्यात यावा.

विषय क्र. १७५

पुणे महानगरपालिका उद्यान विभागामार्फत पुणे महानगरपालिकेच्या कार्यक्रमांच्या व्यतिरिक्त नागरिक/ खाजगी/ सरकारी/ निमसरकारी संस्था/मंडळे/मा.सभासद/लोकप्रतिनिधी इत्यादीकडून त्यांचे खाजगी कार्यक्रमांसाठी तात्पुरत्या स्वरुपासाठी सजावटीकरीता त्यांचेकडून लेखी मागणी आल्यास कुंडयाचे भाडे व अनामत रक्कम यांचे दरात खालीलप्रमाणे वाढ करणेसाठी मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/उद्यान/१४१ दि.२९/६/२०२० चे पत्र.

अ.क्र.	तपशील	प्रचलित दर (र.रु.)	प्रस्तावित दर (र.रु.)
१)	पुणे महानगरपालिका उद्यान विभागामार्फत भाडयाने देण्यात येणाऱ्या कुंडयाचे भाडे व अनामत रक्कम	भाडे – र.रु.१/– प्रतिकुंडी अनामत – र.रु. १०/–	भाडे – र.रु.१००/– प्रतिकुंडी/प्रतीदिन अनामत रक्कम र.रु. ३००/– प्रतीकुंडी

(टीप– सदर विषयाचा विचार १ महिन्यांनंतर करावा असे दि. १७/४/२०२३ च्या सभेत ठरले होते.)

निर्णय– सदर विषयाचा विचार १ महिन्यांनंतर करण्यात यावा.

<u>संकीर्ण</u>

विषय क्र. १७६

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १५२ मध्ये वसूल न होण्याजोगा कर निर्लेखित करणेसाठी(बिगर निवासी ०२ प्रकरणे)खालील बाबींस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/Tax/१२५, दि. ११/५/२०२३ चे पत्र.

१. कर आकारणी व करसंकलन कार्यालयाकडून यापुर्वी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १५२ प्रमाणे वसुल न होण्याजोगा कर निर्लेखित करणेबाबत तयार करण्यात आलेली बिगर निवासी कराची ०२ प्रकरणे व त्यांची माहे मार्च २०२३ अखेरची थकबाकी व २०२२–२३ ची मागणी अशी एकूण रक्कम रुपये१९,३४,९४६/– निर्लेखित करणेबाबत कागदपत्राची तपासणी करण्यात आली असून मिळकतकर रक्कम निर्लेखित करणे बाबत कार्यवाही करणेस,
२. सदरची बिगर निवासीकराची ०२ प्रकरणे निर्लेखित केल्यानंतर नव्याने निर्लेखित करावयाच्या प्रकरणांची कागदपत्रे तपासून, जागातपासणी करुन प्रशासकीय मान्यता घेऊन पुढील प्रशासकीय कार्यवाही पुर्ण करुन त्याचा अहवाल मा.स्थायी समितीस मान्यतेसाठी सादर करणेस,

निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.

विषय क्र. १७७

पावसाळी पूर्व कामाकरिता निधी आवश्यक असल्याने र.रू. ४ कोटीचे खालीलप्रमाणे वर्गीकरणाद्वारे उपलब्ध करून देणेस मा. स्थायी समितीमार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आपत्ती व्य./१३८, दि.१७/५/२०२३ चे पत्र.

अर्थशिर्षक	कमी	अधिक
सन २०२३–२०२४ चे अंदाजपत्रक प्रकल्प विभाग, पुणे महानगरपालिका, FE61A118/B-118 पुणे शहरामध्ये विविध ठिकाणी उड्डाणपूल बांधणे .	र.रू. २ कोटी	---
पथ विभाग CE20A1266/A18-85 पुणे मनपामध्ये नव्याने समाविष्ट झालेल्या गावांमध्ये रस्ते विकसित करणे.	र.रू.२कोटी	---
<u>**नवीन सुचविलेले काम**</u> आपत्ती व्यवस्थापन विभाग पावसाळीपूर्व कामाकरिता.	---	र.रू. ४कोटी

निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.

विषय क्र.१७८

पुणे पेठ लोहगाव स.क्र.१९९, २०४, २०५, २०६/१, २०९/१ प्लॉट क्र.४४/२ टेकपार्क इमारतीमधील तळमजल्यावरील गाळा क्र.०४ (क्षेत्रफळ १११ चौ.मी.) ही मिळकत उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर (५) पुणे या संस्थेस पाच वर्षे कालावधीसाठी भाडेतत्वावर देणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/माव्य/५९; दि.२४.०४.२०२३ चे पत्रावर झालेला शहर सुधारणा समिती ठराव क्र . ९ दि. ११/५/२०२३ विचारासाठी.

निर्णय– सदरचा विषय मान्य करण्यात येत आहे.

वरीलप्रमाणे कामकाज होऊन कार्यपत्रिका संपली.

सही/–xxx
(शिवाजी दौंडकर)
नगसचिव,
पुणे महानगरपालिका.

वृत्तांत मंजूर.

सही/–xxx
(विक्रम कुमार)
प्रशासक तथा आयुक्त,
पुणे महानगरपालिका.